Bharatiya Shikshan Prasarak Sanstha, Ambajogai

# Swa. Sawarkar Mahavidyalaya, Beed



## Internal Quality Assurance Cell

**CRITERION 3- RESEARCH, INNOVATIONS & EXTENSION**

**3.3.2. Number of books and chapters in edited volumes/books published and papers published in national/international conference Proceedings per teacher during the last five years**

**CHAPTER IN BOOKS/ PAPERS IN PROCEEDINGS**

**2021-22**

(02442) 226218 (02442) 225918 veersawarkarbeed@gmail.com

*Bhartiya Shikshan Prasarak Sanstha, Ambajogai*
Swa. Sawarkar Arts, Science & Commerce College
Re-accredited by NAAC-B Grade
Sawarkar Nagar, Jalna Road, Beed M.H., India- 431122

CRITERIA-III
RESEARCH INNOVATIONS & EXTENSION
**CHAPTER IN BOOK/PAPERS IN PROCEEDINGS**
**2021-22**

| Sr. No. | Author | Name of the BOOK/ Proceedings | Chapter in a Book/ Papers in a proceedings |
|---|---|---|---|
| | | 2021-22 | |
| 1 | Dr Sopan Survase M. | Bhartiya Swantantraycha Amruth Mahosave:Sandhi Aani Aavane- Andhasardha Nirmulanamadhe Sant Sahityche Yougdan | |
| 2 | Dr. Bhalerao Jyotishwar K. | Samkalin Manavi hakka | Nagari sthanik prashashasan ani mahila arakshan |
| 3 | Dr. Bhalerao Jyotishwar K. | Current Issues ,Challenges and Opportunities in Social Sciences | Bhrtiya Dharm nirpekshata v saman nagari kayda |

Swa.Sawarkar M. B.S.P.S Ambajogai ...yalaya,Beed

Principal
Swa.Sawarkar Mahavidyalaya,
Beed.

Dr. SM Surwase 2021-22

(8) B-CB-P
2021-22

(5)(6)

आज़ादी का
अमृत महोत्सव

# भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव : संधी आणि आव्हाने



मुख्यसंपादक
प्राचार्य.डॉ.सदाशिव सरकटे

**ISBN No.: 978-81-955479-7-5**

मुख्य संपादक
प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे
मो. नंबर : 7875827115

*

**प्रकाशक**
सिद्धी पब्लिकेशन,
मारोती मंदिराजवळ,
भावसार चौक, तरोडा खु. नांदेड़
मो. 9623979067
ईमेल – shrishprakashan2009@gmail.com
Website : www.wiidrj.com

*

**अक्षर जुळवणी**
डॉ. राजेश गंगाधरराव उंबरकर

*

मुद्रक
अनुपम प्रिंटर्स
श्रीनगर, नांदेड़. मो. 9175324437
© सर्व अधिकार संपादकाकडे
*

**प्रथम आवृत्ती**
24 मे 2022
**किंमत : 400 /- रु**

सदरील ग्रंथातील कोणताही भाग किंवा मजकूराकरीता सदरील संशोधक स्वतः जबाबदार राहतील संपादक जवाबदार असणार नाही.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | संशोधन पेपरचे नांव | लेखक | पान क्र. |
|---|---|---|---|
| ०१ | 'स्वातन्त्रप्रतिज्ञा' | डॉ. मीनल श्रीगिरीवार | १३ |
| ०२ | १९९० नंतरची मराठी कविता | प्रा. डॉ. रामहरी मायकर | २० |
| ०३ | आंबेडकरी चळवळीतील प्रबोधन गीते | प्रा. संतोष मारुती शिंदे | २८ |
| ०४ | अंधश्रद्धा निर्मुलनामध्ये संत साहित्याचे योगदान | प्रो. डॉ. सोपान माणिकराव सुरवसे<br>श्री.गोविंद दासा गरड | ३४ |
| ०५ | जगतिकीकरण आणि मराठी भाषा | प्रा. राहुल भागवत गायकवाड | ४३ |
| ०६ | स्वातंत्र्यलढ्यात मराठी भाषा आणि साहित्याचे योगदान | प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे<br>प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे | ४९ |
| ०७ | स्वातंत्र्योत्तर काळातील विमुक्तांच्या साहित्य प्रवाहातील स्वातंत्र्य, प्रेरणा व प्रवृत्ती | डॉ. एम. के. शिंदे | ५६ |
| ०८ | "स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील एक दुर्लक्षित विद्वान - गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर" | श्रीमती. वर्षा मुरलीधर पोतदार | ६२ |
| ०९ | दलित, ग्रामीण, स्त्रीवादी आणि आदिवासी साहित्यातून आलेले स्वातंत्र्य चित्रण | प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे<br>फरांडे सारिका संदिपान | ७५ |

# अंधश्रद्धा निर्मुलनामध्ये संत साहित्याचे योगदान

**प्रो. डॉ. सोपान माणिकराव सुरवसे**
मराठी विभाग प्रमुख, स्वा.सावरकर महाविद्यालय, बीड
**श्री.गोविंद दासा गरड**
संशोधक विद्यार्थी

**प्रास्ताविक**

हजारे वर्षे भारतीय समाज अंधश्रद्धेच्या अंधारात बुडून गेलेला असताना अनेक प्रकारच्या अनिष्ट प्रथा, परंपरा, रूढी, जत्रा आणि यात्रा याबरोबरच पशुबळी–नरबळी, वृत्तवैकल्ये चालू असताना या भारतीय समाजाला एक प्रकारची दिशाहीनता निर्माण झाल्याचे चित्र दिसत होते. परिणामी समाजाचे शोषण, लुबाडणुक, फसवणूक आणि छळ यास उत येत होता, समाज दुबळा, भयभीय, कर्तव्यशुन्य, निराश, दैववादी आणि अगतिकतेकडे झुकलेल्या अवस्थेत असताना समाजाच्या मनोभूमितून वाढलेल्या अंधश्रद्धांचा समुळ नायनाट करावा आणि निखळ वैज्ञानिक दृष्टिकोण निर्माण करावा या हेतूने संतांनी आपल्या वैचारिक भूमिकेतून समाजप्रबोधन केल्याचे दिसून येते.

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये आज आपण २१ व्या शतकात म्हणजेच विज्ञान युगात वावरत असताना, वैज्ञानिक प्रगतीचा रथ जगाच्या भूपृष्ठावर दौडवत असताना त्याला अंधश्रद्धेची झालर मात्र लावण्यास नविसरणारा भारतीय समाज आज दिसत आहे. दैववादामध्ये गुरूफडलेला हा समाज लोकशाही मूल्यांकडे दूर्लक्ष करताना दिसतो. या दूर्लक्षामुळे लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्याय या मूल्यांवरच वज्रघात होताना दिसतो.

आज सामान्य माणसांना विज्ञानाची गती अनाकलनिय वाटत असली तरी विज्ञानाच्या गतीने वाटचाल करणे हिताचे ठरणार आहे. म्हणून सर्व प्रकारच्या अंधश्रद्धांना विरोध करून

समाजात वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करणे, ही काळाची गरज झाली आहे.

अंधश्रद्धेच्या आहारी गेलेल्या भारतीय समाजाचे सामाजिक चित्रण वैज्ञानिक दृष्टीकोणातून हजारो मैल दूर उभे असलेले दिसते. अंधश्रद्धांचा प्रवास अंधाराकडे, अज्ञानातुन अज्ञानाकडे, अविश्वासाकडून अविश्वासाकडे, विनाशाकडून विनाशाकडे, विध्वंसाकडून विध्वंसाकडे, अनिष्ठाकडून अनिष्ठाकडे, असत्याकडून असत्याकडे, असमंजसपणाकडून असमंजसपणाकडे आणि अन्यायाकडून अन्यायाकडे चाललेला असताना, अंधश्रद्धेच्या खाईत समाज जात असताना, भान हरवलेल्या समाजास सामाजिक भान आनुन देण्याचे मोलाचे कार्य भारतातील विविध प्रांतातील संतांनी केल्याचे दिसून येते.

आज आपल्या देशामध्ये अंधश्रद्धा निर्मुलनाचे काम 'अंधश्रद्धा निर्मुलन समिती' अगदी गावपातळीवर येउन करू लागली आहे परंतु समाजमन मात्र श्रद्धेपासून दूर फेकले गेलेले आणि अंधश्रद्धेला उराशी कवटाळून बसल्याचे दिसते. असे म्हणतात की, समाजपरिवर्तन हे मुंगिच्या पायाने होत असते, पण हत्तीसारख रौद्र रूप धारण केलेल्या अंधश्रद्धेने मात्र समाजास दलदलीत रेटण्याचे काम केलेले दिसते. असे म्हणतात की समाज परिवर्तनाची प्रक्रिया ही मंदपणे चाललेली असते. परंतु अंधश्रद्धेच्या वावटळीमध्ये/बवंडरामध्ये समाज हजारो कोस मागे फेकला जातो हे ही तेवढेच सत्य आहे.

कितीही उदात्त हेतू ठेउन अंधश्रद्धा निर्मुलनासाठी प्रयत्न केले तरी त्यातील काही उणिवा शिल्लक राहतातच आणि त्या पूर्ण करायला गेल्यावर मात्र, त्यांचे दाभोळकर, पानसरे, गौरी लंकेश कामी येतातच यासाठी विचाराने पाउल उचलून वैचारिक क्रांतीची समाजात बीजे पेरून समाजास सामाजिक भान देण्याची गरज आहे याच गरजेपोटी मध्ययुगीन कालखंडात संतांनी समाजाला अंधश्रद्धेपासून दूर रहाण्यासाठी भान दिले. अंधश्रद्धानिर्मुलनाच्या बाबतीत संत ज्ञानदेवाचा संदेश समाजाच्या हिताचा ठरतो. ते म्हणतात...

**'येह माते नैणेनि भजन'। ते वायाचिया आनी आन।**

**हाणैनि कर्माचे डोळे ज्ञान। ते निर्दोष हो आवे।।1**

याचाच अर्थ असा 'ज्ञान हे कर्माचे डोळे असल्यामुळे ते निर्दोष असायला हवेत.' समाज–मनात शेकडो वर्षे रूजलेल्या अंधश्रद्धा नष्ठ करण्यासाठी समाजाला व्यापक स्वरूपात ज्ञान देण्याची गरज असते, समाज परिवर्तनासाठी विचारांची बैठक पक्की असावी लागते समाजाला भ्रांतमुक्त करण्यासाठी संत ज्ञानदेवांचा हा संदेश कार्यप्रणव झाला पाहिजे. ज्ञानदेवांचा हा विचार या समाजपरिवर्तनाच्या आंदोलनातला मुख्य विचार झाला पाहिजे.

**शास्त्राचार्योपदिष्टर्थऽननुभूतेव्येवमेवैतदितिविश्वासः ।1**

ही श्रद्धेची व्याख्या पुरानामध्ये (सर्वलक्षणसंग्रहात) सांगितलेली आहे. याचा अर्थ असा स्वतःला अनुभव नसला तरी शास्त्र आणि गुरू यांच्या मार्गदर्शनावर विश्वास ठेवणे म्हणजे श्रद्धा. याच श्रद्धेच्या माध्यमातुन संत ज्ञानेश्वरांच्या मार्गावर मार्गक्रम करणाऱ्या संतांनी समाजातील अंधश्रद्धा निर्मुलनासाठी प्रयत्न केले आणि समाजाला सामाजिक भान देऊन श्रद्धेकडे वळवून सामाजिक मूल्यांची, धार्मिक मूल्यांची रूजवणूक केली.

**अंतरी निर्मळ, वाचेचा रसाळ। त्याचे गळा माळ असो नसो।**
**वृत्त एकादशी मात्र हे देहाशी। नित्य मनापाशी दिवाळीचा।।1**

अशा वरवरच्या ढोंगी, दिखाऊ आचरणाचा संतांनी निषेधच केला आहे. केवळ मुंडन करून स्वर्ग मिळत असेल तर ज्या मेंढ्यांचे वारंवार मुंडन केले जाते. त्या मेंढ्या मग का नाही स्वर्गात जात? अशा उपरोधाच्या सुरात संत कबीरदासांप्रमाणे अनेक संतांनी ढोंगी, दिखाऊ कर्मकांडाचा धीक्कार केला.

संत तुकारामांनी अभंगाच्या माध्यमातून समाजातील पाखंडपणावर प्रहार केलेले दिसून येतात.

**नव्हे जाखाई जोखाई। मायराणी मेसाबाई।।**
**रंडी–चंडी भक्ती । मद्य–मासांने भक्षिती।।**
**बहरिव खंडेराव। रोटी सुटीसाठी देव ।।**
**गणोबा विक्राळ । लाडू मोदकांचा काळ ।।**
**मुंज्या म्हैशासुरे । हे तो कोण लेखी पोरे ।।**
**वेताळे–फेताळे । जळो त्यांचे तोंड काळे ।।**

**तुका म्हणे चित्ती । धरारखुमाईचा पती ।।1**

अश पद्धतीने तुकारामांनी समाजातील अंधश्रद्धेला खतपाणी घालणाऱ्या परिस्थितीवर प्रहार केला आहे. त्याचप्रमाणे ढोंगी साधूवरही प्रहार करण्यास ते मागे–पुढे पहात नाहीत ते म्हणतात.

**संन्यासाचे सोंग । संपादिले सांग ।।**
**वैराग्याचे अंग । आणिता नये ।।4**

सोंग हा बाह्याचार आहे तर 'गुण अंगी अंगवणे' हा अंतरिक परिवर्तनाचा मार्ग आहे. प्रापंचिक अडचणींचा निरास करण्यासाठी नवसायास करून देवाला साकडे घालणे योग्य नव्हे. म्हणून संत तुकाराम खणखणीतपणे लोकांचा मूर्खपणा, ढोंग, अज्ञान, अघोरी आणि अनाठायी उपाय यांचा समाचार घेतात.

**नवसे पोरे होती । तरी का करणे लागे पती?1**

संत तुकारामाचे हे रोखठोक विधान सर्व प्रकारच्या अतार्किक कर्ममांडाचा मुर्खपणा सिद्ध करणारे आहे. मानवी दैनंदिन अडचणींचा निरास नवसायास किंवा देवदेवतांच्या उपासनांनी होत नाहीत. तसा प्रयत्न करणे ही योग्य नव्हे. कारण त्यामुळे ढोंगी–तांत्रिक त्याचा गैरफायदा घेऊन जनसामांन्याना लुबाडतात, त्यांना भयभीत करतात.

जीवनात बरेवाईट प्रसंग येत असतात, कधी सुख कधी दुःख येत असते. अशा वेळी काही चमत्कार घडून अडचणींचा निरास व्हावा अशी अपेक्षा व्यक्त होते. सुखाच्या मागे लागलेला समाज नरबळी, पूजापाठ, यज्ञ–याग, होमहवन करून देवकृपा व्हावी यापोटी अंधश्रद्धेच्या आहारी जातो. त्यातुन धार्मिक दांभीकता निर्माण होते. अशा दांभिकतेवर तुकारामांनी वारंवार प्रहार करून समाज जागृत करण्याचे कार्य केले.

देव सर्वत्र असताना उगीचच आरडा–ओरडा करून उफराटे भजन कशाला करायचे? सचेतन वृक्षाच्या बेल, तुळशी तोडून अचेतन दगडाला कशासाठी वाहायच्या? अग्निहोत्राच्या नावाने शमी, पिंपळासारख्या वृक्षांची काष्ठे जाळून त्या वृक्षांशी शत्रुत्व का करायचे? तोंड दाबून प्रसन्न होतो का? अशाप्रकारे समाजाच्या डोळ्यात झळझणीत अंजन घालणारे संत

एकनाथांनी समाजातील अंधश्रद्धांनी गुरफटलेल्या माणसाला जागे करण्याचेकाम आपल्या लेखणीतुन केले. ते म्हणतात.

**म्हणती देव मोठे–मोठे। पूजितानी दगडगोट।।1**

जिवंत प्राण्यांचा वध करून दगडाला नैवद्य दाखवणे म्हणजे 'जन भुलले मूर्खपणे।' हे उमगते. मेसाबाईसारख्या देवतेची उपासना करून देवीचा गोंधळ घालण्यापेक्षा आणि मेंढरे, बोकड मारून, बळेच अंगात आणून नाचणाऱ्या संत एकनाथ ढोंगीच म्हणतात व त्यांवर टीकेच्या भडिमार करतात.

कलियुगात दगडाला शेंदूर फासलेल्या दैवतांचा फार सुळसुळाट झाला आहे. या देवता, सात धान्यांचे धपाटे अशा वस्तु मागतात. अशा देवांवर टिका करतांना एकनाथ म्हणतात.

**फणितखोर ऐसे देव। त्यांच्या तोंडावर भुंकू।।1**

अशा शब्दात संत एकनाथ त्यांचा धीक्कार करतात. प्रतिमेचा देव खोटा म्हणुन त्याला केलेला नवसही खोटाच! आपणच घडवलेल्या प्रतिमेत देवपण कोठून येणार? सचेतनेचा द्वेष आणि अचेतनेची पूजा करणाऱ्यांना खरा देव कसा दिसणार? केवळ टिळा–टोपी लावून कपाळी स्वतःला संत म्हणवणारे हे दांभीक, खोटे असतात. ते विषयवासनेत गुरफटलेले असतात. स्त्रीवासनाग्रस्त असतात. त्यांना परमार्थ कोठून कळणार? केवळ अंगाला राख फासून साधू म्हणवणारे आणि भलते मंत्र भोळया भाविकांना देणारे हे परम ढोंगी आहेत.

हिंदू धर्मावर आणि समाजावर बहुदेववादाचा विशेष प्रभाव पडलेला दिसतो. बहुदेववादाच्या समर्थनातुनच 33 कोटी देवतांची एक संकल्पना रूढ झाली. सजीव तसेच निर्जीव अशा दोन्ही प्रकारात देवांची कल्पना हिंदूमध्ये रूढ आहे. प्राणी देव, पक्षीदेव, वृक्षदेव, अग्निदेव, वायूदेव, वरूणदेव, सूर्यदेव, चंद्रदेव, दगडधोंडादेव, अमुक वस्तुदेव, तमुक वस्तुदेव मानण्याची संकल्पना संत बसवेश्वरांनी नाकारली. उपयुक्त ठरणाऱ्या सर्वच गोष्टींना देव मानणे आणि त्यावर श्रद्धा ठेऊन काही विधीवर्तन करणे त्यांनी चूकीचे व विसंगत मानले. सजीव–निर्जीव गोष्ठीना देवदेवता मानून त्यांची पूजा प्रार्थना–उपासना करण्याच्या प्रवृत्ती

व पद्धतीतून बऱ्याच अंधश्रद्धा रूढ झाल्या आपल्या वचनात बसवेश्वर सांगतात,

**"मडके देव, सूप देव**
**अन् रस्त्याबाजूचा दगडही देव...**
**हा देव अन् तो देव म्हणत म्हणत**
**पाऊल ठेवण्यासाठीही नाही ठेवली जागा.**
**म्हणावे का या साऱ्यांना देव?**
**पहा बंधूनो,**
**देव तर एकच एक कूंडलसंगमदेव."3**

संत बसवेश्वरांनी होम-हवन, यज्ञ अग्निपूजा निषिद्ध मानल्या. त्यांनी या गोष्टींना सक्रिय विरोध केला. यज्ञादी विधी करून काहीही साध्य होणार नाही याची त्यांना खात्री होती. पारंपारिक भारतीय समाजात यज्ञादी विधीचे सर्रास आयोजन केले जाई. अशा यज्ञामध्ये मोठ्या प्रमाणात प्राण्यांचा बळी दिला जाई. यामध्ये बळी देण्यासाठी ओढून नेत असलेल्या बोकडाला उद्देशून बसवेश्वर आपल्या एका वचनात म्हणतात,

**"मंत्र म्हणत म्हणत**
**पहा देती तुला बळी**
**अरे बोकडा तू रड,**
**वेद वाचनाऱ्यापुढे रड**
**शास्त्र पुराणे श्रवण करणाऱ्यापढे तू रड**
**तुझ्या रडण्याने तरी**
**बळी देणाऱ्यांना करील शासन**
**कूंडलसंगम-देव"2**

भारतीय संस्कृती आणि लोकजीवन यांचे समग्र दर्शन घडवणारे संत तुकडोजी महाराज यांनी 'ग्रामगीता'च्या माध्यमातून अंध समाजास जागे करण्याचे कार्य केले. "लोकांशी जे जे शिकवावे। ते आधी आपणची आचरावे।।" असे त्यांचे प्रामाणिक मत होते. कर्मकांड, अंधश्रद्धा याबद्दल त्यांना चीड होती. गावात रोगराई येते त्याचे कारण अस्वच्छता आणि अरोग्यविषयक नियमांचे अज्ञान असते पण गावातील लोक म्हणत की

"मग कोणी म्हणे कोपली देवी। कोणी मांत्रीकासी बोलवी।।
कोणी करणी कौटाळ म्हणती। कोणी पिशाचार म्हणती।।
औषधी न देता रोगी मारती। मूर्खपणाने।।"1

संत तुकडोजी महारांनी रेडे, कोंबडे, बकरे बळी देण्याच्या सामाजिक प्रथेवरही प्रहार केला आहे. समाजाचे अज्ञान दूर झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने गावचा विकास होणार नाही. या संदर्भात ते म्हणतात,

देवासि पाहिजे बलिदान। तो पशु आपुला भ्रम अभिमान।।
गावचे गेल्याविणा अज्ञान। सुखी होई जीवन।।

समाजात भोंदूगिरीला ऊत आलेला पाहून तुकडोजी महाराज समाजाला सन्मार्ग दाखवण्याचा प्रयत्न करतात ते म्हणतात,

भगवे रंगले तरी काय झाले? त्यागी नाही चाले तरिते व्यर्थ।।
लंगोटी घातली तरी काय झाले? मन ना निघाले विषयातुनी।।
संसार सोडला तरी काय झाले? पर दार सोडले नाही ज्याने।।
तुकड्यादास म्हणे जरी माळ घाले। वर्म ना जाणले तरि ते व्यर्थ।।1

यापुढे जाऊन तुकडोजी महाराज अत्यंत मार्मिक शब्दात भोंदूगिरीपासून समाजाची कानउघडणी करताना म्हणतात

पाय करी निरंतर। फिरे गावी उजागर।।
ठेवी खांद्यावरी शेला। दिसे गावामध्ये भला।।
मनी नाही जरा शांती। संगे लोका संभाविती।।
तुकडयादास म्हणे ऐशा नरा। मोजुनी माराव्या पैजारा।।
यांच्या बोले जरी पुत्र होय लोक। कासयासी भिक मागती हो।
तुकडयादास म्हणे ऐशा गुरूपाठी। हाणावया काठी भीऊ नये।।1

आज विज्ञान युगात वावरत असताना देखील शिक्षित उच्चशिक्षित डोळसपणे जगण्याऐवजी अंधश्रद्धेच्या आहारी गेलेले दिसतात. तिर्थयात्रा, सत्यनारायण, गावायात्रा यामध्ये मोठया प्रमाणात अंधभक्त निर्माण होताना दिसतात. अशा समाजाला दिशा देण्याचे काम संत गाडगे महाराजांनी 19 व्या शतकात केले. मुक्या प्राण्यांचा बळी देणे, भुतप्रेतावर विश्वास ठेवणे, गंडे–दोरे बांधणे देवदेवतांना नवसायास करणे यासारख्या अनेक

अंधश्रद्धेस विरोध करत किर्तनाच्या माध्यमातुन समाजजागृती करणारे संत गाडगेबाबा म्हणजे अंधश्रद्धा निर्मुलनाचे एक फिरते विद्यापीठच. ते म्हणतात.

**शेंदूर माखोनिया धोंडा। पाया पडती पोरे रांडा।।**
**देव दगडाचा केला। गवंडी त्यांचा बाप झाला।।**
**देव सोन्याचा केला। सोनार त्याचा खाप झाला।।**
**देव मातीचा केला। कुंभार त्याचा बाप झाला।।**
**सोडोनिया खऱ्या देवा। करी म्हसोबांची सेवा।।**[1]

लोक जत्रा यात्रा करतात, ही सुद्धा एक प्रकारची अंधश्रद्धाच आहे असे गाडगेबाबा म्हणतात म्हणून ते पुरावा देत म्हणतात,

**"जत्रा में फतरा बिठाया। तीरथ बनाया पाणी।।**
**दुनिया भली दिवानी। पैसे की धुलधाणी।।**
**काशी गया प्राग त्रिवेणी। तेथे धोंडापाषाण पाणी।।**
**तीर्थवासी गेले । आणि दाढीमिशा बोडून आले।**
**पाप आंतरातले नाही गेले। दाढी मिशाने काय केले।।"**[1]

मुक्या प्राण्यांची देवाच्या नावाने होणारी हत्या ही देवाची थट्टा आहे. देव कोंबडे बकरे मागत नाही तुम्हाला देवाला बकरे घ्यायचे तर देवाच्या नावाने गावात सोडुन द्या. देवाच्या नावाने मुक्या प्राण्यांची हत्या करणे ही राक्षसी प्रवृत्ती आहे. यासंदर्भात गाडगेबाबा लोकांच्या सद्सद् विवेकबुद्धीला जागे करण्याचे काम करताना म्हणतात,

**"मांस मांस सब एकही है। मुरगा बकरा गाय।।**
**ऐसा मानव चूतिया । बडा प्रेम से खाय।।**
**अपणे बेटे का शिर मुंडावे। देव सुरा लग जाय।।**
**दुसरो की तो गर्दन काटे। जरा शरम नही आय।।"**[1]

वैज्ञानिक विचारांची रूजवणुक करणारे वीतभर दगडाच्या पुजेने ब्रह्मांड व्यापणारा परमेश्वर मिळत असेल तर मी पर्वताची पूजा करीन म्हणणारे संत कबीर अंधश्रद्धेवर दोहयांच्या माध्यमातून प्रहार करतात. ते म्हणतात,

**"पाहन (पाषाण) पूजै हरि मिलै, तो मैं पुजूं पहार(पहाड)।**
**ताते यह चक्की भली, पीस खाय संसार।।"**

कबीरांचे काव्यविचार केवळ अंधश्रद्धेवर व्यंग प्रहार करणारे, कोरडे ओढणारे आसुड नसुन त्यामागे व्यवहाराची एक बैठक आहे म्हणून वीतभर दगडाच्या मूर्तीपूजेपेक्षा ते पीठ देणाऱ्या जात्याची पूजा पसंत करतात. पुढे ते म्हणतात,

**"कांकर पाथर जोरी के मसजिद लई बनाय।**
**तपर मुल्ला बांग दे, क्या बहिरा हुआ खुदाय।।"1**

ओरडून धर्मश्रद्धांच प्रदर्शन करणाऱ्यांना कबीरांनी केलेला प्रश्न महत्वाचा आहे. खुदा काय बहिरा आहे? अशी विचारणा करून मुस्लिम धर्मातील अंधश्रद्धांवरही कबीर भडकतात.

**समारोप**

आज यंत्रयुगात, आधुनिक जगात जगत असताना अंधश्रद्धेसारख्या प्रथेला, समस्येला समाज बळी पडताना दिसत असला तरी भारतातील विविध संतांनी मध्ययुगीन कालखंडात जे अंधश्रद्धेवर कोरडे ओढले, समाज जागृती केली त्यातुन समाजातील बऱ्याच प्रमाणातील अंधश्रद्धा दूर झाल्याच्या दिसुन येतात. असे असले तरी आजही ग्रामीण भागात वेगवेगळया अंधश्रद्धा बळावताना दिसतात.

अंधश्रद्धेला मुठमाती देण्यासाठी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत बसवेश्वर, संत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा, संत कबीर यांसारख्या अनेक संतांनी प्रयत्न केलेले दिसुन येतात. आपल्या किर्तन, प्रवचन, अभंग, भारूड, दोहे अशा साहित्यातून समाजाला योग्य दिशा देण्याचे काम केले.

**संदर्भ–**


१. प्राचार्य रा.तू.भगत – संत साहित्य आणि अंधश्रद्धा निर्मुलन, रिया पब्लीकेशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, ऑक्टोबर, २०११

२. डॉ.अशोक कामत – बसवेश्वरे रचिला पाया, सेंटर प्रकाशन, सोलापूर, प्रथमावृत्ती–२००१

३. डॉ.जयदेवी लिंगाडे – बसव वचनामृत, बसव समिती, बेंगलोर–१९८९

४. डॉ.कल्याण काळे, रा.शं.नगरकर – संत साहित्य : अभ्यासकाच्या काही दिशा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९२

५. डॉ.म.वि.गोखले– आला संताचा मेळा, अरगडे कुलकर्णी प्रकशन पुणे ३०, प्रथमावृत्ती, ऑगस्ट १९७५

# समकालीन मानवी हक्क

■ डॉ. रिता एम. धांडेकर

■ प्रथम आवृत्ती – १० डिसेंबर २०२१


© प्रकाशक व संपादक


■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.
हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,
वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती
मो. ९५९५५६०२७८
email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,
कठोरा रोड, अमरावती

■ Price : 200/-

ISBN-978-93-91305-56-7


सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

## संपादकीय

'समकालीन मानवी हक्क' या विषयावरील प्रस्तुत ग्रंथाचे संपादन 'भारत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्ष आणि जागतिक मानवी हक्क दिनाच्या निमित्ताने करताना मला मन:पूर्वक आनंद होत आहे. मानवी हक्कांचे समकालीन संदर्भ संशोधनात्मक तथा वस्तुनिष्ठ विश्लेषणाद्वारे विशद करण्याचे कार्य प्रस्तुत संपादकीय ग्रंथातील लेखांद्वारे अनेक प्राध्यापक, संशोधक असणाऱ्या लेखकांनी केले आहे. आपण सर्व सजग नागरिक तथा मानवी हक्काचे समर्थक या दृष्टिकोनातून माझ्या 'समकालीन मानवी हक्क' या संपादित ग्रंथाचे स्वागत कराल अशी आशा आहे.

समकालीन सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक परिस्थितीत व्यक्तीला सुखी व समृध्द जीवन जगण्यासाठी मानवी हक्क चिरंतन व शाश्वत आहेत. प्रत्येकाला सन्मानपूर्वक जीवन जगण्याची संधी मिळणे आवश्यक असताना अनेक बालक, महिला, आदिवासी घटक, दिव्यांग व्यक्ती त्यापासून वंचित असलेले दिसतात. समकालीन स्थितीत महिला सुरक्षितता, तृतीयपंथीयांची समस्या, लिंगभाव समानता, मूल्य शिक्षण, असंघटित घटकांचे प्रश्न, निर्वासितांचे हक्क अशाप्रकारचे अनेक मानवी हक्कविषयक मुद्दे समस्यांच्या स्वरुपात आज चिंतनाचा विषय ठरत आहेत. या संदर्भातील संशोधनात्मक विचारमंथन प्रस्तुत ग्रंथातील लेखांद्वारे लेखकांनी अतिशय संवेदनशीलपणे केलेले आहे.

कोरोनाच्या परिस्थितीत मानवी हक्कांचा प्रश्न अत्यंत ऐरणीचा बनलेला दिसून येतो. आरोग्य, अन्नसुरक्षा, पर्यावरण, शिक्षण, बरोजगारी, दारिद्र्य यासारख्या विभिन्न घटकातील सुरक्षितता प्राप्त होणे मानवी हक्काच्या दृष्टिकोनातून अत्यावश्यक असताना कोरोनाकालीन परिस्थितीमुळे यासंदर्भात शासन व प्रशासनासमोर मोठे आव्हान निर्माण केले आहे. आपली अर्थव्यवस्था मोडकळीस येते की काय अशी धास्ती सर्वसामान्यांच्या मनामध्ये निर्माण झाली होती. अनेक जीवनावश्यक असणाऱ्या सामान्य गरजा सुध्दा भागविणे अनेकांना शक्य होत नव्हते. अर्थात सामाजिक सुरक्षेप्रमाणेच मानवी हक्कांच्या सुरक्षेचा प्रश्न समकालीन व्यवस्थेत अतिशय गंभीर बनलेला आहे. अशाप्रकारच्या विचित्र स्थितीत शासन व प्रशासनाची भूमिका काय असावी यांविषयी दिशा प्रदान करण्याचा प्रयत्न प्रस्तुत ग्रंथातील लेखाद्वारे लेखकांनी केलेला दिसून येते.

| | | |
|---|---|---|
| 14 | भारतीय संविधान आणि मानवाधिकार<br>**प्रा.डॉ.दिनकर संतुकराव कळंबे** | 97 |
| 15 | अन्नसुरक्षा मानवाचा एक मुलभूत अधिकार : भारताची सध्यास्थिती आणि उपाययोजना<br>**डॉ.आशालता सोनवणे** | 106 |
| 16 | नागरी स्थानिक प्रशासन आणि महिला आरक्षण<br>**डॉ. भालेराव जे.के.** | 113 |
| 17 | आदिवासी समुदाय आणी मानवी हक्क<br>**डॉ.हेमंत केशवराव बारसागडे** | 121 |
| 18 | वृध्द व्यक्तींचे मानवी हक्क<br>**डॉ. सौ.मेधा देशपांडे** | 131 |
| 19 | मानवाधिकार आणि भारतातील दहशतवाद<br>**डॉ. संयज गोपाळराव ठवळे** | 142 |
| 20 | मानवी हक्कांच्या संदर्भात समाज कल्याण विभागाचे महत्त्व<br>**गीतांजली शंकरराव चव्हाण** | 150 |
| 21 | सुशासन : संकल्पना आणि महत्व<br>**प्रा. डॉ. भगवान श्रीपती सांगळे** | 158 |
| 22 | मानवी हक्क आणि शिक्षण<br>**Dr. Golhar Anuradha Sandip** | 168 |
| 23 | मानवाधिकार : अर्थ, गरज आणि स्वरुप<br>**डॉ.आवचर सीमा राघू** | 172 |
| 24 | मनवाधिकार एवं महिला सुरक्षा से सशक्त राष्ट्र निर्माण<br>**डॉ. योगासना कचौले पाराशर** | 179 |
| 25 | मानवी हक्क आणि महिला<br>**प्रा.शहाणे रंजना प्रल्हादराव** | 187 |
| 26 | महिला आणि मानवी हक्क डॉ. भालचंद्र गोविंदराव कुलकर्णी | 194 |

रोजगार निर्मिती झाली आणि त्यानंतर जागतिक स्तरावर शहरीकरणाचा वेग वाढला. भारतात १९८० च्या दशकापासून यांत्रिकीकरण, संगणकीकरण,जागतिकीकरण,वाढती लोकसंख्या, खुली अर्थव्यवस्था, परदेशी गुंतवणूक, शैक्षणिक व आरोग्य सुविधा व रोजगारवृद्धी इत्यादी कारणांमुळे शहरीकरण घडून आले. सन २०११ मध्ये भारतात वाढत्या शहरीकरणाचे प्रमाण ३०.१६ टक्के इतके तर महाराष्ट्रात ४५.२२ टक्के इतके होते. याच कालावधीत भारतात ७९३५ शहरे होती तर महाराष्ट्रात ५३४ शहरे होती. सध्या भारतात २४७ महानगरपालिका असून महाराष्ट्रात २७ महानगरपालिका, २४१ नगरपरिषद, १२८ नगरपंचायती ५५ पोर्ट ट्रस्ट व ७ कटक मंडळे इत्यादी नागरी संस्थाद्वारे शहरी भागाचे व्यवस्थापन करण्याचे व पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याचे कार्य केले आहे.

**भारतातील नगरांचा इतिहास:** मानवी संस्कृतीच्या विकासामध्ये नगरांचे विशेष असे महत्त्वाचे स्थान राहिलेले आहे. कारण नगरांचा इतिहास मानवी संस्कृतीच्या इतिहासात इतका प्राचीन आहे. ग्रामीण जीवन पद्धतीपेक्षा वेगळ्या पद्धतीची आणि खेडयापेक्षा अधिक व दाट लोकसंख्या असलेल्या मानवी वसाहतीस नगर किंवा शहर असे म्हटले जाते. वैश्विक स्तरावर "अर" हे मेसोपोटेमियातील सर्वात प्राचीन नगर मानले जाते. प्राचीन नगरे नाईल, टायगर्स, युफ्रेटीस,हवांग ही नदी खोऱ्यात वसलेली पहावयास मिळतात. सिंधू संस्कृतीतील मोहंजोदडो व हडप्पा या नगरांना शहरी व्यवस्थापनाचा उत्कृष्ट नमुना म्हटले जाते. मेगॅस्थेनीस ने आपल्या "इंडिका" या ग्रंथात मौर्य कालीन राजधानी "पाटलीपुत्र" या नगरीचा उल्लेख केलेला आहे. तसेच मध्ययुगीन कालखंडातील ऐन-ए-अकबरी या प्रसिद्ध ग्रंथात अबुल फजल याने मुगल कालीन सर्व बादशहा साम्राज्याच्या राजधानी असलेल्या नगराच्या ठिकाणी वास्तव्य करीत असत असे नमूद केले आहे. नगराच्या आकारमाना विषयी जगात सर्वत्र एकवाक्यता दिसून येत नाही. स्वीडन व डेन्मार्क या देशात केवळ २०० लोक



असणाऱ्या वसाहतीस नगर असे संबोधले जाते. चिली या देशात १००० लोकसंख्या, अर्जेंटिना २००० लोकसंख्या, भारत व घानामध्ये ५०००,स्विझर्लंड मध्ये १००००,जपानमध्ये ३००० आणि अमेरिकेत ४०००० लोकसंख्या असणाऱ्या वसाहतीला नगर व शहर म्हटले जाते. जगातील सर्वात मोठी महानगरे शाघांय (चीन),टोकियो (जपान), न्यूयॉर्क (अमेरिका),मास्को (रशिया),लंडन (इंग्लंड),पॅरिस (फ्रान्स) व कलकत्ता (भारत) यांना ओळखले जाते.

**महाराष्ट्रातील नागरी प्रशासन :** इ. स. १७२६ मध्ये महाराष्ट्रात नागरी प्रशासनाची सुरुवात झाली.कारण त्यावेळी मुंबईसाठी मेयर्स कोर्ट (Mayor's Court) स्थापन करण्यात आले. तत्पूर्वी सन १६८७ मध्ये भारतातील पहिली महानगरपालिका मद्रास येथे ब्रिटीश सम्राट जेम्स दुसऱ्यांनी राजपत्र द्वारे स्थापन केली. त्यानंतर सन१७२६ मध्ये बॉम्बे व कलकत्ता येथे महानगरपालिका स्थापन करण्यात आल्या. लॉर्ड मेयोचा आर्थिक विकेंद्रीकरणाचा ठराव(१८७०) आणि भारतातील स्थानिक संस्थांची मॅग्नाकार्टा असे संबोधले जाणाऱ्या लॉर्ड रिपनचा ठराव (१८८२) यांनी भारतातील स्थानिक संस्थांच्या संकल्पना रेखाटली. त्यानंतर प्रत्येक प्रांतात लोकल बोर्ड व डिस्ट्रिक्ट बोर्ड सुरू करण्यात आले. इ. स. १८५० मध्ये कायदा करून म्युनिसिपल बोर्ड स्थापन केले. तसे पाहता १७५० ते १८५० हा कालखंड भारतातील पंचायतराज व्यवस्था ऱ्हासाचा कालखंड मानला जातो. इंग्रजांनी ओळखले होते की पंचायतीमुळे हिंदुस्थानचा समाज कायम एकसंघ राहील ही भिती त्यांना होती म्हणून त्यांनी गावाच्या विकासा ऐवजी नगराच्या विकासाला प्राधान्य दिले आणि जिल्हा हा प्रशासनाचा घटक निश्चित केला. पुढील काळात मोर्ले-मिंटो कायदा(१९०९), मॉटेग्यू- चेम्सफोर्ड सुधारणा कायदा(१९१९) आणि भारत सरकारचा १९३५ चा कायदयान्वे नागरी प्रशासनाचा विकास होत गेला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्थानिक स्वराज्य संस्था हा विषय राज्य सूचीतील असल्याने प्रांतनिहाय वेगवेगळे कायदे करण्यात आले. महाराष्ट्र राज्य स्वतंत्र झाल्यानंतर (१ मे १९६०) नगरपालिके संबंधी

ठेवण्यात आले. त्याचबरोबर अनुसूचित जाती व जमातींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ३३ टक्के महिला आरक्षणाची व्यवस्था करण्यात आली. केंद्र सरकारने कालांतराने ११० वी घटना दुरुस्ती करून १५ एप्रिल २०११ रोजी महिकरिता स्थानिक नागरी संस्थांमध्ये ५० टक्के आरक्षणाची तरतुद केली.

**महाराष्ट्रातील विभाग निहाय नागरी स्थानिक संस्था**

| अ. क. | विभाग | जिल्हे | महानगरपालिका | नगरपालिका | नगर पंचायत |
|---|---|---|---|---|---|
| १. | कोकण | ०७ | ०९ | २२ | २१ |
| २. | नाशिक | ०५ | ०५ | ४० | १७ |
| ३. | पुणे | ०५ | ०५ | ५० | १६ |
| ४. | औरंगाबाद | ०८ | ०४ | ५० | २५ |
| ५. | अमरावती | ०५ | ०२ | ४० | १६ |
| ६. | नागपूर | ०६ | ०२ | ३८ | ३३ |
| एकूण | सहा | ३६ | २७ | २४१ | १२८ |

स्तोत्र:राज्य निवडणूक आयोग संकेतस्थळ महाराष्ट्र राज्यातील जिल्ह्याची संख्या पाहिली तर ती ३६ इतकी असून महानगरपालिकांची संख्या २७ एवढी आहे. नगरपरिषदा २४१ आणि १२८ नगर पंचायती ही संख्या पाहता महाराष्ट्र राज्य हे शहरीकरणाच्या बाबतीत देशात आघाडीवर असलेले दिसून येते. नागरी संस्थेतील सदस्य व पदाधिकाऱ्यांच्या पदांमध्ये देखील ५० टक्के जागा या महिलांकरिता राखीव ठेवण्यात आल्या असून त्यामुळे पुरोगामी व प्रगत



असलेल्या महाराष्ट्रात स्थानिक स्तरावर पुरुषराज नव्हे तर "महिलाराज" आपणास पहावयास मिळते. आपल्या देशाला किंबहुना महाराष्ट्र राज्याला महिलांचा राजकारणातील प्रवेश नवीन नव्हता परंतु गाव व शहर स्तरावर जेव्हा महिलांच्या प्रवेशाची गरज निर्माण झाली. त्यावेळी मात्र, आरक्षण / राखीव जागा यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले. आरक्षणामुळे महिलांना शहर स्तरावर नेतृत्व करण्याची संधी उपलब्ध झाली. मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये महिलांना समान हक्क, समान दर्जा व सन्मान मिळवून स्त्री-पुरुष असमानता नष्ट करणे आवश्यक बनले आहे. कारण देशातील स्त्रियांच्या प्रगती शिवाय देशाची प्रगती शक्य नाही.

**निष्कर्ष:**

स्थानिक स्तरावर नागरी संस्था महिला आरक्षण हे महिलांना राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय राजकारणातील महामार्ग बनेल अशी अपेक्षा होती. भारतातील ७४ व्या संविधान दुरुस्तीतील तरतुदीमुळे महिलांना स्थानिक स्तरावर राज सिंहासनाधीश होऊन निर्णय प्रक्रियेत व स्थानिक विकास प्रक्रियेत चालना देण्याची संधी उपलब्ध झाली आहे.परंतु राष्ट्रीय स्तरावर ५० टक्के आरक्षण न मिळाल्याने राष्ट्रीय महिला नेतृत्व उदयास येणास अडचणी निर्माण होत आहेत. संसदेतील व राज्य विधान सभेतील महिला खासदारांचे व आमदारांचे प्रमाण केवळ १४ टक्के इतकेच आहे.भारतीय स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करताना समाज प्रगल्भता आणि पुरुष प्रधान मानसिकता यामध्ये भारतीय सभ्य समाजात फारसा बदल झालेला नाही हे यावरून दिसून येते.

संदर्भ ग्रंथ सूची :

# Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

**Peer Reviewed And Indexed Journal**

**ISSN 2349-638x**

**Impact Factor 7.149**

**Website :- www.aiirjournal.com**


## Theme of Special Issue

## Current Issues, Challenges and Opportunities in Social Sciences

**(Special Issue No.96)**


## Chief Editor

**Mr. Pramod P. Tandale**

## Executive Editor

**Dr. Type S. K.**
Principal
Kalikadevi Art's Commerce and Science College,
Shirur Kasar Dist. Beed

## Guest Editor

**Dr. Sanjay Sawate**
Associate Professor & Head Dept. Of Geography

## Co-Editor

**Dr. Sudhir Yewle** (HOD, Sociology)

**Dr. Chetna Donglikar** (HOD, Home Science)

**Dr. Jadhav Vitthal** (HOD, Pub.Admin.)

**Mr. Gunde Vitthal** (HOD, History)

**Mr. Pawar Bandu** (HOD, Poli. Science)

JKB 2021-22

2021-22

## Sub themes of the Conference:

- \ugricultural issues problems and solution
- \pplication of geospatial technique for eater future
- mpact of COVID- 19 situation on nvironment
- Consequences of migration in COVID- 19 ituation
- Central state Relation
- Uniform Civil Code - Possibilities And Constitutionality
- Corruption, Poverty and Illiteracy issues
- Education System in India
- Basic Sanitation problem in Rural Area
- Public Health, Healthcare System in India
- Pollution Consequences
- Women's Safety
- Social Stratification
- Social Disorganization
- Aging Problem
- Role of Election Commission
- Regional Parties and Contemporary Politics
- Abolition of 370 and 35 (A)
- Role of Governor
- Judicial Activism
- Majority v/s Coalition Government
- Citizenship Amendment Act

- COVID – 19 Media and Politics
- Art and Architecture.
- Cities and Urbanization.
- Climate and Geography.
- Daily Life and Social Customs.
- Economy and Trade.
- Environment and Natural Disasters.
- Class Struggle & Nationalism
- Empires and Dynasties
- Constitutional culture and humanism
- Developmental challenges from childhood to adulthood
- Women health issues
- Scope and opportunities in Home Science
- Mental Health and Nutrition issues during developing ages
- Challenges of old age
- Other relevant Areas
- Constitutional public Administration.
- Constitutional secularism
- Constitution and secular Nation
- Constitutional Bharat and Today's Reality
- Constitutional Directive principle and implementation.
- Constitutional India and Human Right
- Constitutional Nationalism & Development

### Key-Not Speaker



**Dr. Anoop Kumar Singh**
Asso. Professor. In Sociology,
DAV P G College Kanpur (CSJM UNIVERSITY KANPUR) U.P.

### Resource Person



**Dr. B.C. Vaidya**
Professor in Geography and Geopolitics in the Center for International Politics. Organization and Disarmament, School of International Studies, at Jawaharlal Nehru University, New Delhi.



**Dr. Suman Maurya**
Asst. Prof. Dept. of Pol. Science &
Addl Dean Students Welfare
University of Rajasthan, Jaipur



**Dr. RAMDHAN GANJI**
Asso. Prof. in History,
Telangana Saraswata
Parishath Oriental College,
Hyderabad

### Chief Patron



**Hon. Jaydatt (Anna) Sonajirao Kshirsagar**
Former P.W.D. Minster of Maharashtra, Beed
Secretary, Adarsh Shikshan Sansatha, Beed



**Hon. Bharatbhushan Sonajirao Kshirsagar**
Civic Chief of Beed Municipal Council &
Secretary, Navagan Shikshan Sanstha, Beed

# भारतीय धर्मनिरपेक्षता व समान नागरी कायदा

**डॉ. भालेराव जे. के.**
(लोकप्रशासन विभाग प्रमुख)
स्वा.सावरकर महाविद्यालया,बीड
bhalerao.jkb1973@gmail.com

## प्रास्ताविक :

प्राचीन भारतीय गौरवशाली सर्वधर्मसमभावाची संस्कृती आपल्या संविधानातील "धर्मनिरपेक्षता" या तत्वात प्रतिबिंबित होते. राज्याचा कोणताही धर्म असणार नाही. धार्मिक आधारावर व्यक्ती- व्यक्ती मध्ये कोणत्याही सामाजिक ठिकाणी, सार्वजनिक स्थळी व शासकीय कार्यात भेदभाव केला जाऊ शकत नाही. धर्मनिरपेक्ष राज्य म्हणजे धर्माला विरोध करणे नाही. धर्म ही प्रत्येक व्यक्तीची वैयक्तिक बाब आहे. धर्मभेदामुळे नागरिकांमध्ये फूट पडून राष्ट्राच्या अखंडतेला, एकात्मतेला व स्थैर्याला धोका निर्माण होऊ शकतो. भारतात समान नागरी कायदा नसल्यामुळे नागरिकात अलगाववादी व फुटीरतावादी भावना बळावत असून स्वतंत्र अस्मिता जपली जात आहे. परिणामी देशाच्या धर्मनिरपेक्ष तत्त्वाला छेद दिला जात आहे. भारतात विवाह, वारसा, दत्तक, पोटगी व घटस्फोट इत्यादी बाबतीत व्यक्ती आपल्या धर्मात असलेले नियम, रूढी, परंपरा व कायद्याचे पालन करतो. त्यामुळे भारतीय संविधानाला अपेक्षित असलेल्या कायद्याच्या समोर "सर्व नागरिक समान" या तत्वाला न्याय देण्यासाठी समान नागरी कायदा असणे भारतात आवश्यक झाले आहे. तसेच देशातील लोकांच्या सुरक्षतेसाठी आणि कल्याणासाठी समान नागरी कायदा अंमलात आणणे आवश्यक आहे.

## समान नागरी कायद्याची संकल्पना :

संविधानाने गुन्हेगारी कायदा आणि नागरी कायदा असे विभाजन केले आहे. गुन्हेगारी कायदे सर्व धर्मियांसाठी समान आहेत परंतु नागरी कायदे धर्मातील रूढी, परंपरा व प्रथा यावर आधारित आहेत. नागरी कायद्यात विवाह, घटस्फोट, पोटगी, वारसा हक्क व कुटुंब अशा व्यक्तीच्या व्यक्तिगत जीवनाशी निगडीत असणाऱ्या बाबींचा त्यात समावेश होतो. समान नागरी कायदा म्हणजे सर्व भारतीय नागरिकासाठी सारखा कायदा होय. या कायद्याचा कोणत्याही धर्माशी संबंध असणार नाही. सर्व धर्मियांसाठी एकच कायदा असेल याचा अर्थ समान नागरी कायद्याच्या आशयात भारतातील सर्व धर्मांच्या नागरिकासाठी एकच कायदा असेल असा अर्थ अभिप्रेत आहे. भारतीय संविधानात धर्म, जात, पंथ, भाषा, लिंग व प्रदेश या सर्वांना छेद देऊन समान नगरिकत्व सर्वांना बहाल केलेले आहे. कायद्याचे अधिराज्य (Rule of Law) हे भारतीय लोकशाहीचे अधिष्ठान मानलेले आहे. सर्व नागरिक धर्माने अथवा रुढी, परंपरेने नसून समान कायद्याने बांधलेले आहेत. या भारतीय धर्मावर राहणाऱ्या सर्वांना एकच कायदा या कल्पनेतून समान नागरी कायद्याच्या संकल्पनेचा उदय झाला आहे.

## ऐतिहासिक पार्श्वभूमी:

ब्रिटिशपूर्व भारतात हिंदुना हिंदू चा कायदा व मुस्लिमांना मुस्लीम कायदा लागू होत असे. इंग्रज शासन प्रस्थापित झाल्यानंतर इंग्रज राज्यकर्त्यांना भारतीय कायदे पद्धती कालबाह्य वाटू लागली. हिंदू कायद्यात जातीप्रमाणे शिक्षाही वेगवेगळ्या होत्या. कायदा व सुव्यवस्था निर्माण करणे आणि व्यापाराकरिता शाश्वती निर्माण करणे हे ब्रिटिश राज्यकर्त्यांचे उद्दिष्ट होते. म्हणून त्यांनी इंग्लिश कॉमन ला वर आधारलेले कायद्याचा मसुदा तयार करून ते भारतात लागू केले. कॉमन लॉ हा न्यायालयीन निर्णय मधून निर्माण झालेला होता. त्याच कायद्याचे भारतीय परिस्थितीनुरुप बदल करुन संहितीकरण करण्यात आले. परंतु त्यातून विवाह, वारसा व दत्तक हे विषय वगळण्यात आले होते. १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामातून इंग्रजांनी एक धडा घेतला आणि तो म्हणजे भारतीयांच्या धर्मामध्ये शक्यतो हस्तक्षेप करावयाचा नाही.१८५८च्या राणीचा जाहीरनामा यामध्ये ही बाब स्पष्ट करण्यात आली होती. त्यानुसार हिंदुना हिंदू व मुसलमानांना मुस्लिम व्यक्ती कायदा लागू करण्याचे धोरण अंमलात आले. इ. स.१९५८ ते १९४७ या ९० वर्षाच्या कालखंडात धार्मिक कायदे होते. त्यानुसार त्या त्या समाजाच्या वारसा, विवाह, दत्तक याबाबतच्या व्यवहाराचे नियमन केले जात होते. त्यामध्ये १८७२ चा इंडियन ख्रिश्चन डायव्हर्स कायदा, शीख धर्मियांसाठी आनंद मॅरेज कायदा १९०९. पारसी विवाह कायदा १९३९ आणि १९३७ हिंदू विवाह कायदा इत्यादीचा समावेश होतो.

**संविधानातील मार्गदर्शक तत्वे :**

भारताच्या राज्यघटनेत नागरिकांच्या मूलभूत हक्काची नोंद करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणेच राज्याची मार्गदर्शक तत्त्वे अंतर्भूत केली आहेत. कलम ३८ ते ५१ मध्ये राज्यांनी राज्यकारभार कशा प्रकारे करावा याबाबतच्या तरतुदी आहेत. मार्गदर्शक तत्त्वा विरोधात कोणत्याही न्यायालयात दाद मागता येत नाही. तरी ही मार्गदर्शक तत्वे ही मौलिक व मूलभूत स्वरूपाची आहेत. कलम ४४ मध्ये The shall endeavor to secure for the citizens a uniform civil code throughout the territory of India.असा उल्लेख करण्यात आलेला आहे. परंतु मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केलेच पाहिजे असे कायदेशीर बंधन शासनावर नाही. राज्यकर्त्याच्या इच्छेवर त्याचा अंमलबजावणी अवलंबून आहे.म्हणूनच मार्गदर्शक तत्वे ही केवळ नैतिक उपदेश करतात. त्यांना संविधानिकदृष्ट्या काहीच महत्त्व नाही तसेच बँकेच्या सोयीनुसार वटणारा चेक असे म्हटले जाते.(A cheque payble by the Bank conerned at its convenience)

**एक देश एक कायदा:** एकाच भारत देशात राहात असताना वेगवेगळे कायदे असणे ही बाब राष्ट्रीय भावना निर्माण करण्यासाठी पूरक ठरत नाही. म्हणूनच घटनाकारांनी "एक देश एक कायदा" हासंकल्प केला होता. परंतु संविधान सभे पासूनच समान नागरी कायद्याला मुस्लिम बांधवांचा विरोध होता. २३ नोव्हेंबर १९४८ रोजी या विषयावर सदस्यांत मतभिन्नता झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले. "भारतातील कायदे धर्मावर आधारलेले आहेत.भारतात धर्माबद्दलच्या भावना खूप व्यापक आहेत. त्यामधून जीवनाचे कोणतेही अंग जन्मापासून ते मृत्यूपर्यंत सुटू शकत नाही. या कायद्यात बदल केला नाही तर भारतीय लोकांचे समाज जीवन निव्वळ कोंडीत पकडल्या सारखे बनेल." यावरून ते वेगवेगळ्या धार्मिक कायद्याच्या विरोधात होते हे स्पष्ट होते. भारत एक राष्ट्र असल्याने देशातील सर्व नागरिकांसाठी एकच कायदा असावा त्याला समान नागरी कायदा असे म्हणतात असे मत डॉ. आंबेडकरांचे होते. देशातील एकता, अखंडता व राष्ट्रीय भावना देशवासियांमध्ये त्यांना निर्माण करून बंधुभाव करावयाचा होता. धर्म आधी की देश आधी? याचा विचार सुजाण व सुसंस्कृत नागरिकांनी केला पाहिजे असे ते म्हणत. जगातील इतर कोणत्याही देशात मुस्लिमांसाठी वेगळा कायदा नसताना भारतात मात्र त्यांच्यासाठी वेगळा कायदा आहे. आजही समान नागरी कायद्याचा मुख्यतः विरोध केला जातो तो धर्मनिष्ठ मुसलमानांकडून. मुस्लिम मौल्ला-मौलवींना समान नागरी कायदा झाल्यास आपल्या धर्माचे उच्चाटन होईल "ईस्लाम खतरे मे है"अशी भीती त्यांना आहे. म्हणूनच मुस्लिम समुदाय गेल्या अनेक दशकांपासून समान नागरी कायद्याचा विरोध करीत आहे

**ज्ञानयुग आणि भारतातील नवसमाज:**

एकविसावे शतक ज्ञान युग म्हणून ओळखले जाते. गेल्या दोन दशकात भारतात ज्ञान -विज्ञान-तंत्रज्ञान क्रांतीने एक नवा टेक्नो समाज उदयाला आला आहे. तो जात,धर्म,पंथ, विचारपद्धती, संस्कृती यापेक्षा ज्ञानाला अधिक महत्त्व देतो. असा समुदाय ज्ञानी समाज (नॉलेज सोसायटी)म्हणून ओळखला जातो. मानवाने आपल्या स्वार्थासाठी धर्म निर्माण केले आहेत असे तो मानतो. या सृष्टी वरील सर्व मानव एकसमान आहेत त्याचा माणुसकी हाच धर्म आहे, असा हा समुदाय मानतो. भारतीय समाजाने केलेला आधुनिकतेचा स्वीकार, शिक्षण क्रांतीनं उदयास आलेला नवसमाज, जात व धर्मातील परंपरा व प्रथांना नवतरूणाईने दिलेला छेद, वैचारिक प्रगल्भता, मानवतावादी दृष्टीकोणाचा केलेल्या स्वीकार आणि विज्ञानवादाचा केलेला अंगीकार इत्यादी बाबींमुळे भारतातील उच्च शिक्षित नवसमाज जाती-धर्मांच्या सीमारेषा पुसून टाकण्याचा व जातीअंताची लढाई संपविण्यासाठी पुढाकार घेत आहे. यातूनच अलीकडे आंतरधर्मीय,आंतरजातीय प्रेमविवाह होत आहेत. त्यास समाज मान्यता सुद्धा मिळत आहे. आजच्या इंटरनेटच्या युगात समाज माध्यमावर ओळखीतून मैत्री आणि मैत्रीतून प्रेम अशी एक शृंखला तयार होत असून धर्माच्या विरोधात जाऊन दोन मनांचं मीलन घडून येत आहे. धार्मिक परंपरा व प्रथांना तिलांजली देऊन सात जन्म सोबत राहण्याच्या आणाभाका घेऊन कोट मैरज करण्यात येत आहे त्यामुळे भारतात संमिश्र नवी धर्म संस्कृती उदयास येत आहे. हे धर्मनिरपेक्षतावादी विचार प्रणाली स्वीकारणाऱ्या समुदायासाठी अभिमानास्पद बाब आहे परंतु अशा विवाहाद्वारे झालेल्या अपत्यांना पुढे अनेक प्रकारच्या समस्या व अडचणी निर्माण होत आहेत. एवढेच नाही तर असे प्रकरण न्यायालयात गेल्यानंतर एका धर्माची आई व दुसऱ्या धर्माचे वडील असल्याकारणाने न्याय पालिकेला नाही न्यायदान करणे सुद्धा गुंतागुंतीचे बनत चालले आहे. त्यामुळे समान नागरी कायदा अंमलात आणला जावा. त्यामुळे अशा प्रकारच्या प्रकरणात न्यायदान करणे सुकर होऊ शकेल.

**न्यायपालिकेची भूमिका :**

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने १९८५ ,१९९५ व २००३ मध्ये निरनिराळ्या प्रकरणात न्यायदान करताना समान नागरी कायदा अंमलात आणावा यासंबंधी केंद्र सरकारला निर्देश दिले होते. भारतीय राष्ट्रीय एकात्मतेसाठी व सामाजिक अभिसरणासाठी असा कायदा